| MHOS090001042026 | दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३९/२०२६ |
|---|---|
| | मुजाहिदअली विरुध्द निरंक |
| | निशाणी १ वरील आदेश |

<u>२रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, कळंब, यांचे न्यायालयात</u>

<u>(पिठासीन अधिकारीः एन. एम. रेड्डी)</u>

<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३९/२०२६</u> <u>निशाणी क्र. १</u>

CNR No. MHOS09-000104-2026

## - न्यायनिर्णय -

**(घोषीत दिनांक २० मार्च, २०२६)**

सदरचा अर्ज अर्जदार यांनी ते व अर्जात नमुद वारस हे मयत हाशमअली अहेमदअली सय्यद यांचे वारस असल्याबाबतचा दाखला मिळण्याकरीता बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ अन्वये दाखल केला आहे.

०२. अर्जदार मुजाहिदअली हाशमअली सय्यद हा मयताचा मुलगा, अर्जात नमुद वारस अबेदाबेगम हाशमअली सय्यद ही मयताची पत्नी आहे. तसेच अर्जात नमुद वारस तस्मिन अयुबखान पठाण, परवीन शफीक सय्यद, शहेनबी असेफअली सय्यद, रुकसाना खालेद पठाण, शेख रेहाना नजीर, रिजवाना इरफान शेख व असिया जुबेर सय्यद या मयताच्या मुली आहेत. मयत हाशमअली अहेमदअली सय्यद हे दिनांक १६/०६/२०२४ रोजी मौजे डिकसळ, ता. कळंब, जि. धाराशिव येथे मयत झालेल्या आहेत. मयत हाशमअली अहेमदअली सय्यद यांना अर्जदार व अर्जात नमुद वारसांव्यतिरिक्त अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदाराने अर्ज मंजूर करुन वारस प्रमाणपत्र मिळण्याची विनंती केली आहे.

०३. वरील कथनास पुष्टी देण्यासाठी अर्जदाराने निशाणी १० नुसार पुरावा प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. दस्त यादी निशाणी क्र. ०४ वरील अनुक्रमांक ०१ वर मयत हाशमअली अहेमदअली सय्यद यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची प्रत दाखल करण्यात आली आहे. अर्जदार यांनी त्यांच्या नावे वारस दाखला देण्यास कोणाची हरकत आहे का? हे बघण्याकरीता स्थानिक वृत्तपत्र दैनिक जनमत सर्वसामान्यांचे मध्ये दिनांक ३०/०१/२०२६ निशाणी क्र.०९ नुसार जाहिर प्रगटन प्रसिध्द केले होते. जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यानंतर या अर्जास मुदतीत कोणाचीही हरकत आली नसल्याचे दिसुन येते. त्याबाबतही कोणतीही हरकत प्राप्त झालेली नाही. सबब अर्जदार यांचा अर्ज, त्यांचे मयताशी असलेले नातेसंबंध, तसेच त्यांनी दाखल केलेला कागदोपत्री पुरावा आणि पुरावा प्रतिज्ञापत्र विचारात घेवुन पुढीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | अर्जदार मुजाहिदअली हाशमअली सय्यद व अर्जात नमुद वारस अबेदाबेगम हाशमअली सय्यद, तस्मिन अयुबखान पठाण, परवीन शफीक सय्यद, शहेनबी असेफअली सय्यद, रुकसाना खालेद पठाण, शेख रेहाना नजीर, रिजवाना इरफान शेख व असिया जुबेर सय्यद यांना ते मयत हाशमअली अहेमदअली सय्यद यांचे कायदेशिर वारस असल्याबाबत बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम २ प्रमाणे आवश्यक तो मुद्रांक शुल्क भरल्यानंतर वारस दाखला देण्यात यावा. |

NITIN MAHADEO REDDY

Digitally signed by NITIN MAHADEO REDDY
Date: 2026.03.20 17:03:31 +0530

( एन. एम. रेड्डी )

दिनांक : २०/०३/२०२६ — २रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर

स्थळः कळंब — कळंब.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment are same, word to word, as per the original judgment.

Name of stenographer: Shri. D. B. Nikam, Stenographer-III,

Court Name : 2nd. Jt. Civil Judge, J.D. & J.M.F.C., Kallam.

Order/Judgment date: 20/03/2026

Order signed by the

Presiding Officer on : 20/03/2026

Order uploaded on : 20/03/2026